# विश्व पांथस्थ

अनिवासी भारतीयांसाठी पहिले मराठी मासिक | VISHWA PANTHASTHA

वर्ष ७ | अंक १ | मार्च २०२४ | मूल्य ₹ १०० | AED 10 | USD 2 | www.panthastha.com

संपादकीय लग्न एक अगतिकता

लग्न अपेक्षांचे दुराग्रह आणि आत्मचिंतन

मुलांची लग्ने

सोयरीक गावाकडचा गुताडा

गावाकडचा मुलगा का नको? मुलीचे मत



अनिवासी भारतीयांच्या गरजा, समस्या व संधी

निरोप द्या, निरोप घ्या कविता

## एन आर आय रेमिटन्स - २०२३-२४ - एक दृष्टीक्षेप

## Form IV

Statement about ownership and other particulars of newspaper VISHWA PANTHASTHA to be published in the first issue of every year after the last day of February

1. Place of publication: A-703, Nisary City 2, Kaspate Vasti, Wakad, Pune - 411 057.
2. Periodicity of its publication: Monthly
3. Printers name: Sandeep Vasantrao Kadwe, Nationality: Indian, Address: A703, Nisarg City 2, Kaspate Vasti, Wakad, Pune – 411 057
4. Editors name: Sandeep Vasantrao Kadwe, Nationality: Indian, Address: A703, Nisarg City 2, Kaspate Vasti, Wakad, Pune – 411 057
5. Name and addresses of individuals who own the newspaper and partners and shareholders holding more than one percent of the toal capital: Sandeep Vasantrao Kadwe, Nationality: Indian, Address: A703, Nisarg City 2, Kaspate Vasti, Wakad, Pune - 411 057

I, Sandeep Vasantrao Kadwe, hereby declare that the particulars given above are true to the best of my knowledge and belief.

Date: 14th March, 2024

Sd/- Signature of publisher

Best Compliments from

in3bet

Incubate Partners

Innovate Incubate Invest Build Expand Transform

Mentoring and Incubation Support

www.in3bet.com | mentor@in3bet.com | Mobile - +91 9860678844 (WA)

विश्व पांथस्थ

अनिवासी भारतीयांसाठी पहिले मराठी मासिक VISHWA PANTHASTHA

# अनुक्रमणिका


- संपादकीय – लग्न – एक अगतिकता ४
- मुलांची लग्ने – प्रमोद कुलकर्णी, पुणे ६
- लग्न – अपेक्षांचे दुराग्रह आणि आत्मचिंतन – ललित कुमार मंडलिक, इंदौर ८
- सोयरीक – गावाकडचा गुताडा – समीर (बापू) गायकवाड ९
- गावाकडचा मुलगा का नको? मुलीचे मत – प्राजक्ता जोशी १०
- एन आर आय रेमिटन्स – २०२३–२४ – एक दृष्टीक्षेप १२
- अनिवासी भारतीयांच्या गरजा, समस्या व संधी १३
- निरोप द्या, निरोप घ्या – संदीप कडवे १५



विश्व पांथस्थ
वर्ष ७ अंक १
मार्च २०२४

अनिवासी भारतीयांसाठीचे पहिले मराठी मासिक

संपादक
संदीप वसंतराव कडवे

संपादकीय व वितरण साहाय्य
राजन ताबडे, अबू धाबी
धवल नांदेडकर, फुजेरा
वीरभद्र कारेगावकर, अजमान
नितीन गायकवाड, औरंगाबाद

मुखपृष्ठ आणि सजावट
विश्व पांथस्थ

मूल्य ₹ 100 | AED 10 | US$2

Vishwa Panthastha
Year 7 Issue 1
March 2024

First Marathi Monthly For NRIs

Editor
Sandeep Vasantrao Kadwe

Editorial & Distribution Support
Rajan Tawde. Abu Dhabi
Dhawal Nandedkar, Fujerah
Veerbhadra Karegaonkar, Ajman
NitinGaikwad-Aurangbad

Cover & Design
VISHWA PANTHASTHA

Price ₹ 100 | AED 10 | US$2

विश्व पांथस्थ हे मासिक मालक, मुद्रक व प्रकाशक संदीप वसंतराव कडवे यांनी ए–७०३, निसर्ग सिटी –२, कस्पटे वस्ती, वाकड, पुणे – ४११०५७. येथे प्रसिध्द केले.
**संपादक - संदीप वसंतराव कडवे**
(पीआरबी कायद्यानुसार जबाबदारी)

Vishwa Panthastha' monthly publication is owned, printed & published by Sandeep Vasantrao Kadwe. and published at A-703, Nisarg City-2, Kaspate Vasti, Wakad, Pune - 411 057.
Mob.: +91 9860678844
e-mail: editor@panthastha.com
website: www.panthastha.com
Editor - Sandeep Vasantrao Kadwe
(Responsible for Selection of News & Articles under the PRB Act.)



या अंकातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.

# संपादकीय



## लग्न - एक अगतिकता

दुर्दैवाने लग्न एक अगतिकता बनत चालली आहे. वैयक्तिक, कौटुंबिक व सामाजिक अगतिकता. तरुण तरुणीच्या लग्नाच्या बाबतीत शहर व खेडी सर्वच ठिकाणी परिस्थिती कठीण होत चालली आहे. सर्वच वाईट आहे असे नाही, पण परिस्थिती काळजी करण्यासारखी नक्कीच आहे.

शहरात मुले मुली आपापली करिअर करण्यात बिझी असतात. आई वडील काळजी करतात पण सोयरीक कशी जुळवावी या बाबत संभ्रम निर्माण होतो. काही आई वडील तर पुरेशी काळजीपण करत नाही. वरवरचे प्रयत्न केल्यासारखे दिसतात. मुलींच्या व मुलांच्या अपेक्षा वाढल्या आहेत. लग्न जुळवण्यात सगे सोयरे नातेवाईक आता फार कमी मदत करतात असा अनुभव आहे. अनेक लग्नात पाहुणे रावळे येतात, तोंडदेखले बोलतात, जेवतात, जातात. आमच्या नात्यात अनेक मुले व मुलींनी आंतरजातीय परप्रांतीय दोघांनी आंतरधर्मीय जोडीदार निवडला आहे. त्यांची लग्ने लावून दिली आहेत. काहींनी घरातून पळून जाऊन लग्ने केली. त्यांचीही पुन्हा लग्ने लावून दिली. अजूनही आसपासची अनेक तिशीतील अथवा तिशी ओलांडलेली सुशिक्षित मुले मुली अविवाहित आहेत. पूर्वी गावाचा भटजी अथवा गावाचा नाभिक सोयरीक जुळवत असे. कारण त्यांच्याकडे संपूर्ण गावकी येत असे अथवा त्यांचा सर्व गावकीचा संपर्क असे. त्यांना कुटुंबाची माहिती असे. आता ती व्यवस्था मोडीत निघाली आहे. जातीची मंडळे थोडीफार कामे करतात, पण आता त्यांना स्वजातीचीच मंडळी जास्त उभे करत नाहीत. एकंदरीत सर्वच लोकांच्या मनात यापुढे जात कितपत मानावी असा संभ्रम नक्कीच निर्माण झाला आहे. अनेक मॅट्रिमोनिअल वेबसाईटस तयार झाल्या आहेत, पण माहितीची खात्री नाही. तिथेही जात आडवी येतेच. मग आंतरजातीय म्हणतांना पोटजातीत नंतर निवडक जातीत लग्न करू अशी अट असते. तिशी ओलांडली कि मग जातीची अट काढून टाकण्याची वेळ येते. अनेक नियम अटी शिथिल होतात. लग्न करणे एक अगतिकता बनत जाते. एक कौटुंबिक, वैयक्तिक, सामाजिक अगतिकता.

खेड्यात, गावोगावी परिस्थती कठीण आहे. धंदेवाईक दलाल दलाली घेऊन लग्ने जुळवत आहेत, मुली लग्नानंतर दागदागिने घेऊन पसार होत आहेत. आमच्या शेतकरी बांधकरी शेजाऱ्यांच्या मुलांची व मुलींची स्थिती कठीण आहे. त्यात सर्व समाज मानपान, फुकटचा बडेजाव, धार्मिक जातीय अस्मिता, आरक्षण, आंदोलने व राजकारणात आकंठ बुडालेला आहे. मूळ प्रश्नाकडे सर्वांचेच दुर्लक्ष होत आहे.

तीन आठवड्यापुर्वी शेती-बांधकऱ्याच्या मुलीच्या लग्नाला गेलो होतो. लग्न पुण्यात, वडगावला, एका मोठ्या विस्तीर्ण पटांगण कार्यालयात. शेकडो पाहुणे आलेले. त्यात गावोगावचे, गल्लीतले, कारखान्याचे पुढारी आलेले. लग्न बाजूलाच, त्यापूर्वी या

पुढाऱ्यांची नावे जाहीर करणे, त्यांना शाल देणे, सत्कार करणे हा प्रकार. त्यातील एकही मान्यवराने वर वधु पित्यासाठी, वधूवरांसाठी साधा फुलांचा गुच्छ देखील आणला नव्हता. लग्न लागल्यावर वधूपिता मला वधूवरांची ओळख करून देण्यासाठी व मी त्यांना शुभेच्छा देण्यासाठी मंचावर गेलो, फुलांचा गुच्छ दिला, शुभेच्छा आशीर्वाद दिले. न जेवता, पाणी न पिता परत आलो. हा माझा बांधकरी मराठा आहे. शेतीत फार उत्पन्न नाही. दारूचे व्यसन आहे. माझेच पैसे उधार घेऊन बुडवले आहेत. बायकोशी मुलाशी त्याचे पटत नाही. घर कसे चालवणार हा प्रश्न आहे. मग लग्नाचा इतका बडेजाव का? त्याच लग्नात इतर मराठा बांधकऱ्यांची तिशीची अविवाहित मुले आली होती. त्यातील काही शेती करतात. काही आसपासच्या काही ठिकाणी नोकरी करतात. आरक्षणाचा त्यातील एकालाही लाभ होणार नाही, बहुधा त्यांची तशी अपेक्षा देखील नसेल.

समाजातल्या या रूढी मला काही पटल्या नाही. सो कॉल्ड नेते मंडळी फक्त स्वतःचा सत्कार करून घेण्यात मश्गुल आहेत. मुलांची सोयरीक जुळावी म्हणून खरोखर कुणीच प्रामाणिक प्रयत्न करत नाहीत. फार वाईट वाटते.

माझा पूर्वीचा शेतगडी जेमतेम २८ वर्षाचा व त्याचा भाऊ २५ वर्षाचा होता. दोघांची लग्ने झालेली होती. मोठा जेमतेम १२ वी व छोटा ८ वी शिकलेला. दोघांना मुली आहेत. आई वडील अजून हजेरीवर जातात. पानटपरी चा पण व्यवसाय आहे. त्या गड्याने काम सोडले. दुसरा गडी आता आहे. तो २८ वर्षाचा. लग्न झालेले. दोन मुले. बारा वर्षे शेती करतोय. तो हि कमी शिकलेला आहे. पण तो व त्याची पत्नी दोघेही हजेरीवर जातात. कष्ट करतात. गावात राहतात. हे पण शक्य आहेच कि. फक्त समजूतदारपणा पाहिजे. या अंकात इतर काही प्रातिनिधिक लेख आहेत. गावाकडच्या मुलांची मुलींची फार मते मांडली नाहीत, कारण ते सोशल व प्रिंट मीडिया पासून जरा दूरच आहेत.

अनिवासी भारतीयांच्या मुलं मुलींची लग्ने जुळवणे हि तर अजून मोठी कसरत आहे. त्याचे प्रश्न वेगळेच आहेत. मुलगा मुलगी शेकडो किंवा हजारो मैल दूर असल्याने भेट नाही, सगळा ऑनलाईन प्रकार, मध्यस्थांवर भिस्त, संपूर्ण माहितीचा अभाव, लग्न करण्यासाठी देखील पुरेशा वेळ देता येत नाही, दोन कुटुंबांचा पुरेसा मिलाप होत नाही. एव्हढे असूनही केवळ जोडीदारांचे सामंजस्य म्हणून अनेक संसार टिकले आहेत.

काही सामाजिक संस्था लग्नाच्या बाबतीत काही चांगले पायंडे पाडण्यासाठी सक्रिय आहेत, पण हा प्रयास पुरेसा नाही असे दिसते. शिवाय यात सातत्य आणि साहचर्य दिसत नाही. सर्व वरिष्ठांनी, जाणकारांनी, सामाजिक संस्थांनी यात लक्ष घातले पाहिजे. कुटुंब हा समाजाचा पाया आहे. तो ढासळता कामा नये.

अर्थात यासाठी प्रांतीय भाषिक धार्मिक जातीय उन्माद व समीकरणां पलीकडे प्रयत्न करणे जरुरी आहे. तेव्हढे प्रगल्भ नेतृत्व सध्यातरी आसपास दिसत नाही. जातीचे अवडंबर न करता पालकांनी व निवडक वरिष्ठांनीच यात पुढाकार घेऊन वेळेतच हा प्रश्न सोडवावा लागेल.

डॉ. संदीप कडवे
विश्व पांथस्थ, मार्च २०२४,
पुणे

# मुलांची लग्ने

- प्रमोद कुलकर्णी, पुणे



मित्रांनो नमस्कार. विषय मनात यायला वेळ लागत नाही. हल्ली बरेच मुलांचे पालक लोक हैराण झाल्याचे नजरेस (निदान माझ्यातरी) येत आहे. मुलगा / मुलगी लग्नाची आहेत, पण लग्न होण्यास विलंब होत आहे. बाब गंभीर आहे म्हणून हा लेख लिहीत आहे. कुठेतरी विवाहसंस्था संतुलन बिघडत जात असल्याची जाणीव मनात येते आहे.
मनाला खटकणारी उदाहरणे समोर आली म्हणून या लेखाचा जन्म.

आमच्या काळात म्हणजे ३५ वर्षापूर्वी, पालकांना, आपल्या मुलांच्या लग्नाची काळजी नसायची की कसे होणार आपल्या मुलाचे लग्न?? वधुवर सूचक मंडळ, किंवा कोण्या एका मध्यस्थाने सुचवलेले मुलीचे किंवा मुलाचे स्थळ. त्या काळात संगणक नव्हते, म्याट्रीमोनियल साईट्स नव्हत्या. मोबाईल नव्हते. सर्व काही टेलिफोनवर अवलंबून.

त्यावेळी मुलाकडे, मुलीच्या घरचे येऊन, मुलगी दाखवायचा कार्यक्रम होत असे. मुलीची पसंती, नापसंती ही मग साधारण एका आठवड्यात मुलीच्या पालकांना तो मध्यस्थी कळवत असे.

आता येतो मुद्द्यावर. हल्ली ईकडे तिकडे जरा
आजूबाजूला, नातेवाईकात, मित्र मंडळींच्या कडून एक गोष्ट बोलता बोलता चर्चेत येते की मुलांची लग्ने म्हणजे त्यांच्या पालकांनाच थोडे टेन्शन. कारणे काय असावीत?? आजच्या मुला - मुलींच्या आपल्या होणाऱ्या नवऱ्याबद्दलच्या, बायकोबद्दलच्या वाढलेल्या अपेक्षा.

लग्ने सहजासहजी का जुळून येत नाही आहेत, त्याची प्रमुख कारणे खालीलप्रमाणे.
१) शिक्षण
२) मुलाच्या किंवा मुलीच्या पॅकेजमधील फरक.
३) आई वडिलांकडून होणारे मार्गदर्शन, संस्कार.
४) बदलत्या उच्च प्रतीची जीवनशैली जगण्याची आस.
५) कोणत्याच गोष्टीत तडजोड न करण्याची वृत्ती.
६) समाजातील / नोकरीतील स्टेटस.
७) भौतिक सुखांबद्दलच्या कल्पना.
८) जबाबदारी किती आणि नेमकी कोणती सांभाळायची याचा अट्टाहास.
९) स्थूलता
१०) वय (जास्तीचे वय किंवा वयामधील अंतर)
११) आंतरजातीय विवाह / प्रेम विवाह यातील अडीअडचणी.
१२) एकाच शहरातील स्थळ हवे.
१३) परदेशातील नोकऱ्या.
१४) कुटुंबाची आर्थिक परिस्थिती. (तुल्यबळ असणे)

१५) पत्रिकेवरील (कुंडली) विश्वास.
१६) लिव्ह इन रिलेशनशिपचे वाढते फॅड.

या संदर्भातील काही गोष्टी निदर्शनास आणू इच्छितो.

१) मुलगा पसंत आहे पण मुलीचे पॅकेज त्याच्या पेक्षा जास्त आहे.
२) मुलींचा आग्रह :- मुलाच्या घरी त्याचे आईवडील लग्नानंतर घरात नकोत. (नकोतच). मी आणि माझा नवरा बास्स. तिसरा माणूस घरात नको. परिस्थिती अशी आहे की, काही (बऱ्याच) ठिकाणी आईवडिलांना एकच अपत्य असते. अशा आईवडिलांनी जायचे कुठे??
३) मुलाच्या नावाने स्वतःचा फ्लॅट, गाडी इत्यादी हवी. मला हे म्हणायचे आहे की, तो मुलगा आधीच शैक्षणिक कर्ज घेऊन स्वतःच्या हिमतीवर त्याने नोकरी मिळवलेली असते. त्याचे हप्ते फेडायचे. काही मुले घरही सांभाळतात, जबाबदारी असते. अशी परिस्थिती असताना स्वतःच्या नावाने एक कोटी रुपयाचा फ्लॅट आणायचा कुठून?? जर एखादा मुलगा नवरा म्हणून आवडलेला असेल तर लग्न झाल्यावर दोघांच्या पैशातून फ्लॅट घेऊ शकतो ना ?? या अटीवरून स्थळ नाकारणे कितपत योग्य??
४) एका मुलाचे घर असे की, घरातील मंडळी पूर्ण शाकाहारी आहेत. मुलगी म्हणते मी घरात नॉन व्हेज बनवणार. मुलाची आई म्हणते, तुम्ही बाहेर खाल्ले तरी चालेल पण घरात नाही बनवायचे.
५) एक सत्य घटना अशी की, ती मुलगीच म्हणते, मुलाचे आई वडील हे स्वर्गवासी हवेत. हे उदाहरण माझ्या नात्यातील आहे. डोकं बधीर झालं हे ऐकल्यावर.
६) एक जोडी साखरपुडा झाल्यावर, प्री वेडिंग शूटला गोव्याला गेली. तो मुलगा मध्यमवर्गीय फॅमिलीतून आलेला आय.टी. मध्ये नोकरीस आहे. तर त्याला ती मुलगी म्हणते रोज एव्हढा एव्हढा पॉकेट मनी हवा. त्या मुलाला ते आवडले नाही, परिणाम अर्थातच लग्न मोडले.

अशी कितीतरी उदाहरणे आपण बघत आहोत. चूक नेमकी कोणाची?? आई वडीलांची की मुलांची?? कुठे तरी विचारांमध्ये,संस्कारांमध्ये मिस मॅच नक्कीच होत आहे. ही सामाजिक समस्या म्हणून मी याकडे बघत आहे. लग्नसंस्थेचे गणित कुठेतरी चुकत असल्याचे जाणवते. सर्वांनाच अगदी मोजमापात अपेक्षेप्रमाणे स्थळ मिळतेच असे नव्हे. कुठेतरी एडजस्टमेंट ही करावीच लागते. असा कोणताही संसार नाही की ज्यात चढउतार नाहीत. कोणत्याही अवास्तव गोष्टींचा हट्ट करून स्वतःच्या लग्नाचे वय वाढवून घेण्यात काहीही अर्थ नाही. पश्चात्ताप झालेली खूप उदाहरणे आहेत. दुर्दैवानं आईवडील हतबल झालेले बघितले आहेत.दोष कुणाचा??

हल्लीच्या मुलांना, त्यांच्या आईवडिलांनीच संसाराच्या सर्व आवश्यक गोष्टी उपलब्ध करून ठेवलेल्या दिसतात. आपल्या आईवडिलांनी त्यांच्या संसाराची सुरूवात कशी केली हे जरा बघावे.

जी उदाहरणे दिली त्यावरून हा लेख एकतर्फी आहे असे समजू नये. मुलांच्या लग्नाच्या संदर्भात जेंव्हा विषय निघतो तेंव्हा मुलांच्या अपेक्षेपेक्षा मुलींच्या नवऱ्याबद्दलच्या अपेक्षा जास्त असल्याचे मत समाजात आहे. मी फक्त वास्तव परिस्थिती निदर्शनास आणून देत आहे. ही माझी मते तुम्हाला पटतीलच असे नव्हे. अशा विषयांवर १० जणांची १० मते असू शकतात. प्रत्येकाचे अनुभव, मते ही वेगवेगळी असतात.

चूक कुणाची / दोष कुणाचा ?? बरोबर काय??
मेसेज:- मुलांनो लग्न हा आपल्या आयुष्यातील अविस्मरणीय असा प्रसंग आहे. प्रत्येक गोष्ट तंतोतंत बघू नका. आत्ता जरी तुमचे लग्न, तुमच्या मनासारखे झाले, तरी संसारात येणाऱ्या सगळ्याच गोष्टी मनासारख्या होतील याची ग्यारंटी नाही, किंबहुना तसे होतही नाही. तुम्ही एकमेकांना पसंत असाल तर बाकीच्या गोष्टी गौण आहेत. थोडे लवचिक रहा. बघा विचार करा. पालकांचाही रोल महवाचा आहे, त्यांच्याकडून परिस्थितीनुसार समुपदेशन हवे, हे ही तितकेच महत्वाचे आहे.

प्रमोद कुलकर्णी
पुणे. (९५५२५८२३६१)

# लग्न - अपेक्षांचे दुराग्रह आणि आत्मचिंतन

- ललित कुमार मंडलिक, इंदौर



पुढील काळात लग्न न झालेल्या वयस्कर तरुण तरुणी मोठ्या संख्येने दिसतील. वृध्द झाल्यावर आधाराला कुणी नसेल आणि पुढील पिढीची वंशवृद्धीच न झाल्याने वृद्धाश्रम मध्ये जाण्याची किंवा एकाकी आयुष्य कंठण्याची वेळ येणार यात शंका वाटत नाही. अपेक्षांचे ओझे बाळगून भविष्याच्या बाबतीत विचार न करणारी ही पिढी स्वतः बरोबर पालकांना सुद्धा आयुष्याच्या वृद्धत्वाच्या टप्प्यावर अनेक चिंता ना जन्म देत आहे. कारण मुला मुलींचे लग्न झाल्यावर पालकांची गृहस्थाश्रम जबाबदारी संपते. पुढील पिढी कडे सूत्रे देऊन पालक आपल्या निवृत्तीच्या आयुष्याचे नियोजन करू शकतात. आता मागील एक पिढी आणि आताची विवाह न झालेली पिढी यांचे निवृत्तीचे आयुष्य खडतर असण्याची शक्यता जास्त आहे. फक्त पैसा, प्रॉपर्टी, दागदागिने, गाड्या म्हणजे सर्व सुख नाही. कौटुंबिक आयुष्यात बऱ्या वाईट आव्हाने आणि संकटे यांना सामोरे जाताना पती पत्नी एकमेकांचा मानसिक आधार असतात. जीवनात पूर्णत्वाचा खऱ्या अर्थाने आनंद मिळवायचा असेल तर वाट्याला आलेलं दुःख किंवा प्रतिकुलता सुद्धा सुसह्य होते ती एकमेकांच्या पूरक भूमिकेमुळे.

शिक्षणाची पात्रता, आर्थिक कमाई, जमीन जुमला, राहण्यासाठी स्वतःचे घर, सौंदर्याच्या व्यापक कल्पना, ठराविक भौगोलिक क्षेत्रात म्हणजे मुख्यतः पुणे, मुंबई, नाशिक येथेच वास्तव्य असावे याचा दुराग्रह, हट्टापायी विवाहाचे वय निघून जात आहे. तारुण्याची किंवा ठराविक वयात वैवाहिक सौख्याची प्राकृतिक अनुकूलता आणि निरामय आनंदाला ही पिढी पारखी होत आहे तेही आपणच आपल्यावर लादून घेतलेल्या अटीमुळे.

खरं तर बायो डेटा बघून किंवा अभ्यासून त्यातील प्रतिकूल मुद्द्यावर कशी मात करून विवाह साठी पार्श्वभूमी तयार करता येईल याचा विवाह इच्छुक तरुण तरुणींनी विचार गंभीरपणे करायला हवा. ठराविक बाबींचा अत्याग्रह हा आपल्या वैवाहिक आयुष्याला मारक आणि बाधक ठरत आहे आणि कल्पनांचे इमले रचूनही वास्तवात एकाकीपणे जगायची वेळ येत आहे. आयुष्याची संध्याकाळ जवळ आल्यावर हा विचार करण्यात आपण एवढी मोठी चूक केली त्याचे परिणाम वैयक्तिक आयुष्यावर तर पडणारच आहेत. पण सामाजिक संतुलन बिघडणार आहे. आपल्या संस्कृतीला सुद्धा ह्या बाबी मारक ठरत आहेत.

स्त्री - पुरुषाच्या आयुष्याची पूर्णता ही वंशवृद्धी, मुलांचे संगोपन, शिक्षण, गृहस्थाश्रम आणि वानप्रस्थाश्रम या पायऱ्यातूनच होत असते. आपण विवाह संस्थेचा पाया आणि ढाचा उखडून टाकत आहोत. आपले अपेक्षांचे दुराग्रह आपल्याला कुठे घेऊन जात आहेत यावर गंभीर पणे आत्मचिंतन करण्याची वेळ आहे.

लोक संख्येत वृद्ध लोकांचे प्रमाण वाढल्याने जपान सारखे प्रगत, विकसित राष्ट्र गंभीर परिणामांना सामोरे जात आहे. घरातील वैयक्तिक विवाहाचा प्रश्न राष्ट्रीय दृष्टिकोनातून किती गंभीर आहे हे तेथील परिस्थितीचा अभ्यास केल्यास कळू शकेल. शेवटी जी तडजोड वय वाढल्यावर करणे अपरिहार्य आहे त्यासाठी सगळे तारुण्य पणाला लावून अपेक्षांचे ओझे किती काळ वाहायचे एव्हढे करून पुन्हा आपण केलेल्या अपेक्षा पूर्ण झाल्याचं नाहीत तर मग इतका वेळ म्हणजे वाया गेलेली अमूल्य तारुण्याची वर्षे, घेतलेले शषर्षीी आणि वाढलेल्या वयाचे काय ?

कृपया संवादाचे पुल बांधून लौकरात लौकर वैवाहिक आयुष्याची स्थिरता कशी प्राप्त करता येईल यासाठी काय पावले उचलावी लागतील याचा मुळा पासून विचार व्हावा अशी अपेक्षा आहे.

# सोयरीक - गावाकडचा गुताडा

- समीर (बापू) गायकवाड



गावाकडच्या मित्राच्या मुलासाठी स्थळ आलेलं. विहिरीला पाणी किती आहे इथेपासून ते सासू सासरे जिवंत आहेत का, नणंद आहे का असल्यास लग्न झालेलं आहे का, नवरदेवाचा भाऊ कमावतो की नाही की नुसता बसून आहे, प्रॉपर्टीवर नावे कुणा कुणाची आहेत, गावातला वाडा कुणाच्या नावावर आहे, पोरगा आयुष्यभर शेती करणार की नंतर कधी नोकरी करणार की नाही, ऊसाचे बिल कणत्या बँकेत जमा होते, कोणत्या कारखान्याला ऊस जातो, उतार किती पडला, एकरी किती टन निघाला, पाणी आटलं तर काय उपाय, कोरडवाहू जमीन किती, रानात गडी किती सालगडी किती, दावण केव्हढी नि त्यांची सोय काय, दुभदुभत्याचं कसं नि काय, नव्या नवरीला कोणकोणती कामे लावणार, ती हातात खुरपं ही धरणार नाही आधीच सांगून ठेवतो आम्ही असे शेकडो प्रश्न अटी विचारल्या गेल्या.

नवरा पोरगा हताश झालाय. लग्नच नको म्हणतो.
बहुसंख्य मुलींना सासू सासरे नणंद नको आहेत, काबाड कष्ट नकोत, गावाकडे राहायचे नाही आणि राहिलेच तर शेतात दारं धरायची नाहीत! सारा गुताडा झालाय. लग्नाची पोरं थोराड होत चाललीत!

आईबापाविना नवरा जन्माला कसा घालायचा असा प्रश्न अन्याबाने विचारला तेव्हा मी शरमिंदा झालो कारण मुलीचे स्थळ माझ्या ओळखीतले होते. अन्याबा म्हणजे मित्राचा बाप आणि नवरदेवाचा आज्जा.

माझ्याकडून नंबर घेत अन्याबाने थेट मुलीच्या बापाला मोबाईलवर दामटत नकार कळवत सुनावले, माझ्या नातवाला बायकु मिळंल न्हाय मिळंल चालंल पर जिला माणसंच चालत नाहीत, मातीची ओढ न्हाई तिला माझ्या उंबऱ्यात पाय टाकता येणार नाही! तुमच्या पोरीचं लगीन व्हावंच पर तुमच्या पोराची सोयरीक करताना येणाऱ्या सुनेने सासू सासरे नको म्हटलं तर काय चंद्रभागेत जीव देणार का? जरा तरी माणुसकी ठेवा राव!

गावाकडची सागवानी म्हातारी अजूनही टकाटक आहेत पण मधल्या पिढीने कच खाल्लाय, आताची पिढीही कणखर आहे. मात्र हे गुंते कसे सुटणार याचे उत्तर कुणाकडेच नाहीये!

- समीर (बापू) गायकवाड
(पुणे)

# गावाकडचा मुलगा का नको? मुलीचे मत

- प्राजक्ता जोशी



नाती जपण्याची, गावाकडचा ओलावा जपण्याची, समाजव्यावस्था जपण्याची जबाबदारी फक्त बायकांवरच? आणि अनेक महाशयांच्या मते त्यासाठी त्यांनी गावातल्या मुलांशी लग्न केलंच पाहिजे, घर, शेती सांभाळलीच पाहिजे. मग अशा वेळी मुलांना नाही म्हणणाऱ्या मुलींविषयी त्या व्हिलन असल्यासारखं लिहिलं जातं.

लहानपणापासून मी मुलींना कसं गावाकडे राहून शेती, बागायती सांभाळणारी मुलं आता लग्नासाठी नको आहेत, हे ऐकत आलेय. गावाकडची मुलं लाखो रुपये कमवत असतील, पण या 'आजकालच्या मुलींना' शहरात राहणारी, महिना १०,००० कमावणारी, छोट्याशा भाड्याच्या घरात राहणारी, नोकरी करणारी मुलंच कशी पाहिजे असतात, हे काही आता नव्यानं बोललं जात नाहीये, अनेक वर्षांपासून तोच पट्टा सुरु आहे, आणि अजूनही लोक, भले-भले, जाणते मानणारे लोकसुद्धा आज पुन्हा तेच बोलतायत.

मुलींना गावाकडे का नाही राहायचंय? जर गावाकडे खरंच जास्त पैसा, जास्त चांगलं घरदार असेल, तर मुली का शहरातल्या, आपापलं राहणाऱ्या मुलांशी लग्न करू पाहतात? प्रश्न इतका कठीण नाहीये. गावात, मोठ्या कुटुंबात, राहणं म्हणजे मुलींवर काय काय बंधनं लादली जातात, हे सगळ्यांना चांगलंच माहिती आहे. काही अपवाद वगळता बहुतांश मुलींची गोष्ट एकसारखीच असते. मग आता मुली म्हणत असतील, की आम्हाला स्वयंपाकघरात बंदिस्त होऊन नाही जगायचं, किंवा आम्हाला शेतावर काम नाही करायचं, आम्हाला मोठ्या कुटुंबात दररोज सगळ्यांची काळजी घेत नाही राहायचं, तर त्याच्याकडे फक्त 'मुलींचे नखरे कसे वाढलेत', 'मुलींना अजिबात कष्ट नको आहेत', याच अँगलनं बघता येऊ शकतं का? कपड्यांपासून, चालणं-बोलणं, काम करणं, ते अगदी दिवसातून किती आराम मिळेल, यातल्या प्रत्येक गोष्टीवर जर गावाकडे बंधनं येणार असतील, तर का वाटू नये मुलींना की नाही राहायचं गावात? (हे सगळं काही मनघडन नाहीये, अनेक मुलींचे अनुभव ऐकूनच समजलेलं आहे)

बरं आणि या लग्नाळू मुलांच्या नखऱ्यांचं काय? गोरीचं मुलगी पाहिजे, बारीक पाहिजे, तिला स्वयंपाक आला पाहिजे, मोठ्यांसमोर साडी नेसलीच पाहिजे, सगळ्यांचं सगळं निमूट ऐकून घेणारी पाहिजे, हे सगळे नखरेच नाहीत का? आणि या क्रायटेरियामध्ये न बसणाऱ्या मुलींना, म्हणजे काळ्यासावल्या मुली असतील, जाड मुली असतील, अशा मुलींना लग्नासाठी मुलं न मिळणं, हे अशा क्षुल्लक कारणांसाठी वर्षानुवर्षं सहन करावं लागतंय, त्याचं काय?

कदाचित काही मुलींचे नखरे असतीलही, चला मान्य करूया. पण मुलींना असणारी स्वातंत्र्याची ओढ, आणि त्यासाठी शहरात, कुटुंबापासून दूर राहण्याशिवाय दुसऱ्या कुठल्याही पर्यायाचा अभाव, हे सगळं खोटं आहे का? आणि शहरात राहणं म्हणजे मुलींना स्वतःचं करियर आणि स्वतःच्या पॅशनचासुद्धा विचार करता येतो, जे अनेक जणींना गावातल्या बंधनांमध्ये शक्य नसतं, त्याचं काय? त्यामुळं गावाकडच्या मुलांनी मुली लग्न करत नाहीत म्हणून रडत बसण्यापेक्षा ज्या व्यवस्थेमुळं मुलींना लग्न करून गावात, मोठ्या कुटुंबात राहावंसं वाटत नाही, त्या व्यवस्थेशी फारकत घ्यावी आणि त्यात बदल करावे.

मुली शेतकरी असतात, मुली कष्टकरी असतात. सर्वच मुलींचा काही कष्टांना नकार नसतो. आणि ही व्यवस्था बदलण्याचा प्रयत्न काही मुली करतातही आहेत. पण स्वातंत्र्याची किंमत जर गावाबाहेर पडणं असेल, तर जोपर्यंत ही व्यवस्था बदलत नाही, तोपर्यंत खुशाल नाही म्हणावं मुलींनी वाट्टेल तेवढ्या गावाकडच्या मुलांना....

- प्राजक्ता जोशी, Indie Journal
(पुणे व गोवा).


**तुमचा व्यवसाय, उद्योग, सेवा जगभरच्या निवडक लोकांपर्यंत कसा काय पोहचेल? विश्व पांथस्थच्या साहाय्याने**

**विश्व पांथस्थ मासिकात जाहिरात का करावी**

अनिवासी भारतीय जवळपास ४८ पेक्षा जास्त देशांत स्थलांतरित झाले आहे. जवळपास २ करोड पेक्षा जास्त भारतीय या देशांत वास्तव्य करत आहेत. त्यापैकी मराठी अनिवासी साधारण २० लाख असतील. हे मराठी व अनिवासी भारतीय भारतातील अनेक वस्तूंची व सेवांची खरेदी करतात. त्याचे मूल्य दरवर्षी साधारण एक हजार करोड रुपयांपेक्षा जास्त असते. एनआरआय ची मुख्य गुंतवणूक अथवा खर्च रिअल इस्टेट, ट्रॅव्हल टुरिसम, हॉस्पिटॅलिटी, हेल्थकेअर, रेस्टॉरंट व हॉटेल, फूड, कपडेलत्ते, एजुकेशन, रिटेल सेक्टर, एफएमसीजी, सामाजिक व धार्मिक संस्थांना दान, या प्रमुख सेक्टर मध्ये होते. त्यामुळे या सेक्टर मध्ये कार्यरत सगळ्या कंपन्यांनी, व्यक्तींनी, संस्थांनी मराठी अथवा भारतीय एनआरआय पर्यंत पोहचण्याचा प्रयत्न केला पाहिजे.

**मासिकाबद्दल थोडक्यात**

विश्व पांथस्थ हे अनिवासी भारतीयांसाठी २०१५ मध्ये सुरु केलेले ठळ्ख रजिस्टर्ड एकमेव मासिक आहे. आजपर्यंत या मासिकाचे छापील अंक युएई, बहरैन, सौदी अरेबिया, कुवैत, ओमान, भूतान, आफ्रिका, युरोप, रशिया, सिंगापूर, बँकॉक, मलेशिया, फार ईस्ट, अमेरिका या अनेक ठिकाणी पोहचले आहे. छापील अंक पाठवण्याचा खर्च जास्त येतो म्हणून डिजिटल स्वरूपात या मासिकाचा डिजिटल अंक सोशल मीडिया मधून अनेक सामाजिक मंडळे, बिझनेस फोरम, अनेक सामाजिक संस्था, हजारो व्यक्तींपर्यन्त पोहचतो. मासिकाची वेबसाईट आहे, एक मोबाईल ऍप आहे, त्याठिकाणी देखील जाहिरात प्रसिद्ध केली जाते. भारतात अनेक राज्यात हे छापील अंक तसेच डिजिटल अंक वितरित केले जातात. यातील असंख्य अंक फ्री दिले जातात. अनेक वाचनालये, अनेक कॉन्फरन्स या ठिकाणी हे अंक वितरित करण्याचा प्रयत्न केला जातो. महाराष्ट्र राज्य सरकारने तसेच माजी मुख्यमंत्री यांनी मासिकासाठी विशेष शुभेच्छा दिल्या आहेत व या उपक्रमाचा गौरव केला आहे.

विश्व पांथस्थ हे केवळ मासिक नाही, हा एक उपक्रम आहे. मासिक हे माध्यम आहे. आपले सहकार्य व सहभाग या उपक्रमाला एक नवीन ऊर्जा देईल. या माध्यमातूम तुमचा व्यवसाय उद्योग भरभराटीला आला तर आम्हाला त्याचा खूप आनंद होईल.

**मासिकासाठी जाहिरातीचे दर (एका जाहिरातीसाठी दर रुपयात, सर्व जाहिराती रंगीत)**

| | |
|---|---|
| कव्हर पेज दोन- रुपये २०,००० | कव्हर पेज तीन - रुपये २०,००० |
| बॅंक पेज . रुपये २५,००० | पूर्ण पान . रुपये १५,००० |
| अर्धे पान . रुपये १०,००० | |

जाहिरात ३० दिवस अगोदर बुक केली व पूर्ण पेमेंट केले तर जाहिरात दरावर २०% वीस टक्के ते ३०% तीस टक्के पर्यंत सूट देण्यात येईल. जाहिरात सॉफ्ट कॉपी हाय रेसोलुशन मध्ये पीडीएफ व सीडीआर फाईल मध्ये द्यावी लागेल.

जाहिरात तयार नसेल तर जाहिरात तयार करण्यासाठी म्हणजे डिसाईन करण्यासाठी देखील मदत करण्यात येईल, डिसाईन चार्जेस वेगळे आकारले जातील. जाहिरातीचे संपूर्ण शुल्क जाहिरात प्रसिद्ध होण्यापूर्वी द्यावे लागेल.

**जाहिरातीसाठी व अधिक माहिती साठी संपर्क**

**ई-मेल-** editor@panthastha.com | मोबाईल व्हाट्सएप - +९१ ९८६०६७८८४४ | www.panthastha.com



**Non Resident Indians (NRIs) have very specific requirements. They spend a lot on buying products and services they need.**

**Do you want to advertise your product, services or projects to NRI market ?**

**We will help you reach NRIs**

**For advertisement, write to**
**editor@panthastha.com**
**www.panthastha.com**


विश्व पांथस्थ
अनिवासी भारतीयांसाठी पहिले मराठी मासिक VISHWA PANTHASTHA

अनिवासी भारतीयांपर्यंत पोहचण्याचा राजमार्ग


आजवरच्या वाटचालीत असंख्य अडचणींना तोंड देऊन आपण समर्थपणे उभे आहेत.
याबद्दल कौतुक आहेच.
एक सहृदय भारतीय म्हणून आपले योगदान मोलाचे आहे.
आपल्या सर्व इच्छा पूर्ण होवो, त्याकरता शारीरिक,
मानसिक व आत्मिक ऊर्जा आपल्याला मिळावी
हीच परमेश्वर चरणी प्रार्थना !



# एन आर आय रेमिटन्स - २०२३-२४ - एक दृष्टीक्षेप




२०२४ साठी भारतासाठी रेमिटन्सचा दृष्टीकोन मजबूत आहे. २०२३ मध्ये १२.४% वाढ होण्याची शक्यता असून ते १२५ अब्ज किंवा देशाच्या सकल देशांतर्गत उत्पादनाच्या ३.४% असेल, भारत हा सर्वात मोठा रेमिटन्स प्राप्तकर्ता असेल, असे जागतिक बँकेने प्रसिद्ध केलेल्या ताज्या अहवालात म्हटले आहे.

२०२३ मधील रेमिटन्स वाढीचे प्रमुख कारण हे युनायटेड स्टेट्समधील ऐतिहासिकदृष्ट्या खालावलेले लेबर मार्केट (कामगार बाजार), युरोपमधील वाढलेला रोजगार दर, कामगार हिताच्या कार्यक्रमांचा व्यापक लाभ आणि उच्च उत्पन्न असलेल्या देशांमध्ये कमी होत जाणारी वाढ आहे. रेमिटन्समध्ये २०२४ मध्ये १३५ अब्ज डॉलर्सची उलाढाल होण्याची शक्यता असताना, पुढील वर्षी वाढ ८% पर्यंत राहण्याची अपेक्षा आहे.

२०२३ मध्ये १२.४ % रेमिटन्सची वाढ मागील वर्षी नोंदवलेल्या २४.३% च्या निम्मी होती, परंतु कमी आणि मध्यम-उत्पन्न असलेल्या देशांनी नोंदवलेल्या ३.८ % वाढीच्या जवळपास चौपट होती.

अहवालात पुढे नमूद करण्यात आले आहे की भारताच्या फिनटेक प्रणालीतील क्रांतीमुळे देखील रिमितांस वाढीला मदत होईल. भारत आणि सिंगापूर यांच्यातील सीमापार रेमिटन्ससाठी युनिफाइड पेमेंट्स इंटरफेस (णझख-झरूछे) लिंकेज सारखे सरकारचे उपक्रम फेब्रुवारी २०२३ मध्ये लॉन्च केले गेले, रेमिटन्स पाठवण्याचा व्यवहार खर्च कमी करण्यासाठी आणि औपचारिक माध्यमांद्वारे उच्च रेमिटन्स प्रवाह सुलभ करण्यासाठी अशीच सुविधा इतर देशांमध्ये विस्तारित केली जात आहे.

**GCC फोकस -**
अहवालात असे निदर्शनास आणले आहे की २०२३ मध्ये रेमिटन्सच्या प्रवाहाला आखाती देशांनी देखील पाठिंबा दिला होता, जे यूएस, यूके आणि सिंगापूर नंतर देशाच्या यादीत दुसऱ्या क्रमांकाचे सर्वात मोठे प्रमाण आहे.
सीमापार व्यवहारांसाठी स्थानिक चलनांच्या वापराला प्रोत्साहन देण्यासाठी आणि पेमेंट आणि मेसेजिंग सिस्टम्स एकमेकांशी जोडण्यासाठी सहकार्यासाठी फ्रेमवर्क स्थापन करण्यासाठी संयुक्त अरब अमिरातीसोबतच्या फेब्रुवारी २०२३ च्या करारामुळे भारताला रेमिटन्सचा फायदा झाला, असे अहवालात नमूद करण्यात आले आहे.
सीमापार व्यवहारांमध्ये दिरहम आणि रूपयांचा वापर औपचारिक चॅनेलद्वारे अधिक पैसे पाठवण्यास मदत करेल, असे त्यात म्हटले आहे.

**आऊटवर्ड रेमिटन्स -**
वित्त वर्ष २४ की पहली छमाही में, उदारीकृत प्रेषण योजना (एलआरएस) के तहत भारतीयों द्वारा विदेश भेजा गया पैसा १८.३४ बिलियन डॉलर के रिकॉर्ड उच्च स्तर पर पहुंच गया। यह पिछले वित्त वर्ष की इसी अवधि में भेजे गए धन की तुलना में ३७ प्रतिशत अधिक है। भारतीय रिज़र्व बैंक के एलआरएस के तहत, सभी निवासी भारतीय किसी भी अनुमेय चालू या पूंजी खाता लेनदेन या दोनों के संयोजन के लिए प्रति वित्तीय वर्ष (अप्रैल - मार्च) २,५०,००० अमेरिकी डॉलर तक स्वतंत्र रूप से भेज सकते है।

# अनिवासी भारतीयांच्या गरजा, समस्या व संधी



अनिवासी भारतीयांना अनिवासी होण्यापासून ते भारतात कायमस्वरूपी परत येण्यापर्यंत अनेक समस्यांना तोंड द्यावे लागते. आजच्या या आपल्या लेखांमध्ये आपण त्यातील काही निवडक समस्या यांचा उहापोह करणार आहोत. भारतातून परदेशात नोकरीसाठी अथवा व्यवसायासाठी कायमस्वरूपी स्थलांतरित होण्याकरता अनिवासी भारतीयांना मूळ पात्रता धारण करावी लागते या पात्रतेनुसार आणि असे भारतीयांची विविध प्रकारे वर्गवारी करण्यात येऊ शकते उदाहरणार्थ उच्चशिक्षित व अनुभवी भारतीय उच्च पदावरील नियुक्तीसाठी परदेशात स्थलांतर करतात व नंतर कायमस्वरूपी अमेरिका, युरोप, ऑस्ट्रेलिया, न्यूझीलंड, दुबई वगैरे ठिकाणी स्थायिक होतात. यातील दुबई सोडले तर ते इतर ठिकाणचे नागरिकत्व स्वीकारतात त्यानुसार त्या देशाचे पारपत्र स्वीकारतात व भारतीय नागरिकत्व सोडतात. या दृष्टीने ते भारतीय राहत नाहीत, म्हणून त्यांना पर्सन ऑफ इंडियन ओरिजिन (पी.आय.ओ.) अथवा ओव्हरसीज सिटीजन ऑफ इंडिया (ओ.सी.आय.) या वर्गवारीत समाविष्ट करण्यात येऊ शकते या प्रकारचे एनआरआय अथवा (ओ.सी.आय.) यांना परदेशी स्थलांतर करण्यासाठी आवश्यक पात्रता असल्यामुळे व आर्थिकरित्या सक्षम असल्यामुळे, फारशा अडचणींचा सामना करावा लागत नाही. परंतु त्याखालील इतर पात्रता धारक भारतीयांना नोकरी शोधण्यापासून सुरुवात करावी लागते. यातही दोन प्रकार असतात.

एक म्हणजे उच्च शिक्षणासाठी भारतातून परदेशात स्टुडन्ट विसावर राहत असलेले भारतीय विद्यार्थी शिक्षणक्रम शिक्षण पूर्ण केल्यावर त्या देशात इंटर्नशिप मिळवून अथवा नोकरी मिळून तिथेच स्थायिक होतात. याचे मुख्य कारण म्हणजे या विद्यार्थ्यांनी मायदेशातून शिक्षणासाठी कर्ज घेतले असते व ते भारतात येऊन फेडणे शक्य नसते म्हणजे भारतात तेवढ्या पगाराची नोकरी मिळत नाही. म्हणून परदेशात नोकरी मिळवून सर्वप्रथम शैक्षणिक कर्ज फेडणे हा या विद्यार्थ्यांचा प्राधान्यक्रम असतो.

दुसरा प्रकार म्हणजे भारतात शिक्षण पूर्ण केलेले व थोडाफार अनुभव असलेले अथवा अनुभव नसलेले स्किल अथवा अन स्किल नोकरदार. यांना त्यांच्या शैक्षणिक पात्रता व अनुभवानुसार नोकरी शोधण्यास वेळ लागतो. परदेशात विजा मिळणे कठीण असते. अमेरिका, युरोप व ऑस्ट्रेलिया या ठिकाणी अशा उमेदवारांना नोकरी मिळत नाही कारण त्यांच्याकडे त्या त्या देशात काम करण्याचा विजा नसतो. दुबईमध्ये अथवा आखातात मात्र भारतात राहून नोकरी मिळवून मग त्या देशाचा एम्प्लॉयमेंट विजा मिळवून नोकरीसाठी जाता येते. दुबई अथवा आखातातली इतर देश यांनी आर्थिक सामाजिक व नोकरीसाठी उपयुक्त, बरीच प्रगती केली आहे त्यामुळे आता फक्त लेबर कॅटेगरी नाही तर पांढरपेशी नोकरदार यांना या ठिकाणी नोकरी मिळणे शक्य आहे. कालांतराने आर्थिक स्थैर्य व अनुभव जमेस आल्यावर आखातातून न्युझीलँड, ऑस्ट्रेलिया, कॅनडा, अमेरिका, युरोप या ठिकाणी कायम स्थलांतर करण्यासाठी हे नोकरदार अर्थात अनिवासी भारतीय प्रयत्न करतात व कायमचे स्थलांतर करतात. या लोकांचा भारताशी कायम संपर्क राहत असतो म्हणून आखातातून भारतात फार मोठ्या प्रमाणावर रेमीटन्सेस दरवर्षी येत असतात २०२४ सालामध्ये सर्व देशातून भारतामध्ये साधारण १३५ बिलियन डॉलर्स इतका रेमीटन्सेस येईल असा अंदाज आहे यातील ५०% पेक्षा जास्त रेमीटन्सेस हे आखाती देशातून भारतात येतील असा अंदाज आहे.

भारतात येणाऱ्या अशा रेमीटन्सेस वापर मुख्यत्वे खालील गोष्टींसाठी केला जातो.

**१. कंझमशन अर्थात वापरासाठी केलेला खर्च -** अनिवासी भारतीय दिरम्स अथवा डॉलर्स मध्ये भारतात पैसे पाठवतात त्याचे विनिमय मूल्य उच्च असल्याने भारतीय रुपयांमध्ये त्याची खरेदी क्षमता जास्त असते कुटुंबीयांना शिक्षणासाठी दररोजच्या खर्चासाठी, मेडिकल व हेल्थकेअर साठी, लग्नासाठी प्रामुख्याने या पैशांची गरज असते. अनेक कुटुंब त्यांच्यावर असलेले कर्ज फेडण्यासाठी या रेमीटम्सेसचा प्रामुख्याने वापर करतात. टीव्ही, फ्रीज, वाहन, फर्निचर, किराणा, इतर चैनीच्या वस्तू, सोने नाणे दागिने, कपडेलत्ते या सर्व गोष्टींवर भारतातील अनिवासी भारतीयांचे नातेवाईक, ज्यांना हा रिमीटन्स मिळतो, खर्च करतात याशिवाय अनेक प्रकारच्या सेवांसाठी खर्च केला जातो. लग्न, इतर समारंभ यावर मोठा खर्च केला जातो.

**२. रिअल इस्टेट इन्व्हेस्टमेंट अर्थात घर खरेदीसाठी केलेली गुंतवणूक -** रेमीटन्सेसचा दुसरा महत्त्वाचा उपयोग म्हणजे घर खरेदी, जमीन खरेदी अथवा घराची पुनर्बांधणी. यातील ५०% पेक्षा जास्त गुंतवणूकदार हे पहिल्यांदा घर खरेदी करतात. अर्थात या घराचा त्यांना स्वतः राहण्यासाठी वापर करायचा असतो, म्हणून ही त्यांची प्रमुख गरज असते. अशी घर खरेदी शक्यतो त्यांच्या मूळ गावी अथवा मूळ गावाच्या जवळ असलेले मुख्य शहर या ठिकाणी केली जाते.

भारताचा विचार करता केरळ, तामिळनाडू, आंध्र प्रदेश व कर्नाटका, या राज्यातील स्थलांतरित अनिवासी भारतीयांनी गेले कित्येक दशके मोठ्या प्रमाणावर रेमीटन्सेस पाठवल्याने या दक्षिणेतील राज्यांना रियल इस्टेट क्षेत्रासाठी खूप मोठा फायदा झाला. तसेच कंझमशन खूप वाढले. यामुळे या राज्यांची स्थानिक अर्थव्यवस्था खूप बळकट झाली. याचा फायदा पर्यायाने शिक्षण, आरोग्य, रिटेल, होलसेल मार्केट, ट्रॅव्हल टुरिझम, इंटरटेनमेंट व इंडस्ट्री विशेषतः ऑटो इंडस्ट्री, या सर्व क्षेत्रांना झाला. याचा परिणाम सर्व प्रकारच्या सेवा क्षेत्रांवर झाला व आर्थिक बळकटी मिळाली. या खालोखाल उत्तरेकडील राज्यांना रेमीटन्सेसचा असाच मोठा फायदा झाला. महाराष्ट्र गोवा मध्य प्रदेश व गुजरात यांना या राज्यांची अर्थव्यवस्था मुळातच सुदृढ असल्याने कायमस्वरूपी गुंतवणुकीच्या स्वरूपात FDI व रेमीटन्सेसचा खूप मोठा फायदा झाला व अजूनही होत आहे. पूर्वेकडील राज्य त्यामानाने रेमीटन्सेस फायद्यापासून खूप काळ वंचित राहिले व त्यानुसार त्यांची आर्थिक क्षमता विकसित होण्याला मर्यादा आल्या.

**३. पर्यटनासाठी केलेला खर्च -** परदेशातील भारतीय हे भारतात येऊन फार मोठ्या प्रमाणावर पर्यटनासाठी खर्च करतात. यात धार्मिक पर्यटन, मेडिकल टुरिझम, निसर्ग पर्यटन व आजकाल कृषी पर्यटन यावर हा खर्च फार मोठ्या प्रमाणावर केला जातो. याचा लाभ संपूर्ण भारतातील सर्वच प्रसिद्ध पर्यटन स्थळांना होतो व भारत सरकारच्या आत्ताच्या धोरणाला अनुसरून यापुढे हा खर्च प्रचंड वाढण्याची शक्यता आहे.

वरील क्षेत्रातील एनआरआय च्या गरजा ओळखून उद्योजकांनी व व्यावसायिकांनी आपल्या सेवा एनआरआय ना सादर केल्या तर या गरजांचे व त्यांच्या निवारणाचे संधीत रूपांतर होऊ शकते.



# निरोप द्या, निरोप घ्या

- संदीप कडवे

येतील सुखं चोरपावलांनी, नांदतील बागडतील, तुमच्या आसपास
चार दिसाचा पाहुणा समजुन त्यांचा मान ठेवा
सुखाबरोबर नांदा बागडा आनंदी व्हा
वेळ झाली, सुखाचं मन भरलं कि ते, पुढच्या प्रवासाला निघतं
आनंदाने सुखाला निरोप द्या, सुखाने सुखाचा निरोप घ्या

पुढे वाटेवर दुःखही, आपली वाट बघत असते
कि वाटच चारपावलांनी दुःखाला बरोबर आणते?
येतील दुःखे चारपावलांनी, नांदतील बागडतील, तुमच्या आसपास
चार दिसाचा पाहुणा समजुन, दुःखाचाही मान ठेवा
दुःखाबरोबर नांदा बागडा दुःखी व्हा
दुःखाचीही वेळ होते, मन भरलं कि ते पुढच्या प्रवासाला निघते
दुःखाने दुःखाचा निरोप घ्या, दुःखाने दुःखाला निरोप द्या


प्रवासी कोण? पांथस्थ कोण? सुख दुःख कि आपण? बहुधा दोघेही.
गतीमान वा मर्त्य कोण? बहुधा दोघेही.
सुखाने सुखाचा निरोप घ्या, दुःखाने दुःखाला निरोप द्या
आपण वाटेवरून चालतो आणि वाट तिथेच असते?
कि आपण तिथेच असतो, आणि वाटच चालत असते?
अंतर्मनाला कळेकळेपर्यंत, काळ वेळ बदलते
नियती आणि कर्मही खेळच खेळते
अंतर्मनाची द्विधा मात्र वर्तमानात उतरते

सगळाच आभास, अखंड फक्त प्रवास
वाटेवरचा पांथस्थ, आणि पांथस्थाची कास
वाटच प्रवाही असेल कि वाटसरूच चालत असेल?
धुसर होतात दोघेही, का हे सत्यही मिथ्या असेल?
जाणिव नेणिवेच्या सीमारेषा आपल्याला ठरवता येत नाही
सुखातलं दुःख आणि दुःखातलं सुख, कधी वेगळं काढताच येत नाही

वर्तमान हेच सत्य,
भुत भविष्य मिथ्य
भुतकाळाचा निरोप घ्या
भविष्याला निरोप द्या
सुख दुःखाच्या पालखीचा
अलिप्त होऊन भोई व्हा

Vishwa Panthastha CR No. MAHBIL/2018/69261

पांथस्थ फार्म स्टे पुण्यापासून १४० किमी. विठ्ठलवाडी. शांत निसर्ग. विविध झाडे.
पक्षी. वेगवेगळी शेती. पायवाट. तुम्ही व तुमच्या कुटुंबासाठी. दोन दिवस सवडीने
निसर्गाच्या सानिध्यात येऊन राहण्यासाठी. पांथस्थ फार्म स्टे. काहीच करू नका.
फक्त निसर्गासोबत राहा. अवलोकन करा.
सगळ्यात सुंदर वेळ म्हणजे पहाटेची व सायंकाळची.
नयनरम्य सूर्योदय व सूर्यास्त अनुभवा.



Panthastha Farm Stay
140 km from Pune. Vitthalwadi.
Peaceful nature. Trees. Birds.
Various farms around. The trail.
You and your family.
Come and stay
at Panthastha Farm Stay for
two days to get close
to the nature.
Do Nothing Just be with
the nature. Observe.
The most beautiful time
is the morning and the evening.
Experience the picturesque
sunrise and sunset.

Two other options are also available.
At Dongargaon, at the end of Tamhini Ghat,
70 km from Pune and
other option is near Raigad.

**Contact:**
farmstay@panthastha.com
WhatsApp 8349331708